# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

दिनांक 15/10/1997 रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 75 व्या सभेचे

इतिवृत्त :-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची 75 वी सभा बुधवार दिनांक 15/10/1997 रोजी दुपारी 3.00 वाजता प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा माननीय मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनांत मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर सभेस प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा.ना.श्री. अण्णासाहेब डांगे
   अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तथा मंत्री,
   पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
   मंत्रालय, मुंबई.

2. मा.ना.श्री. रविंद्र माने,
   उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
   तथा राज्यमंत्री नगर विकास, पा.पु.व स्व.विभाग,
   मंत्रालय, मुंबई.

3. श्री. व्ही. रंगनाथन,
   सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तथा
   अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
   मंत्रालय, मुंबई .

4. श्री. झनकर, उप सचिव,
   सदस्य , महा. जीवन प्राधिकरण व
   सचिव वित्त विभाग यांचे प्रतिनिधी,
   मंत्रालय, मुंबई.

5. श्री. देवेन्द्र फडणवीस,
   महापौर, नागपूर महानगरपालिका तथा
   सदस्य , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
   नागपूर.

6. श्री. राजन तेली
   अध्यक्ष, जिल्हा परिषद , सिंधुदुर्ग,
   तथा सदस्य , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
   सिंधुदुर्ग.

7. श्री. सुरेश पटवर्धन,
   सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
   पुणे.

8. श्री. माधव कुलकर्णी,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
पुणे.

9. श्री. आविनाथ नवले पाटील,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
नया मोंढा, बीड.

10. श्री. भानुदास पळळकर,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सांगली.

11. श्री. अशिष कुलकर्णी,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
वरळी , मुंबई.

12. श्री. राजीव सरदेशपांडे,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
नागपूर.

13. श्री. जे.एस.साहनी,
सदस्य सचिव (प्रशा. व बाहय अर्थसहाय्य)
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

14. श्री. राजेंद्र सगणे,
सदस्य सचिव (तांत्रिक),
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

प्राधिकरणाच्या सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांची रजा मंजूर करणेत आली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी " विशेष निमंत्रित " म्हणून उपस्थित होते :

1. श्री. शे. दाँ. अरमाळ, मुख्य अभियंता (कोकण विभाग)
2. श्री. सु.का.पाटील, मुख्य अभियंता ( नाशिक विभाग )
3. श्री. नि.कृ. माडा, मुख्य प्रशासकीय अधिकारी
4. श्री. भा.आ.डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.

प्राधिकरणाचे सदस्य सचिव (तांत्रिक) श्री. राजेंद्र सगणे यांनी प्रथम माननीय नामदार श्री. अण्णासाहेब डांगे, अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले व सभेच्या कामाकाजास सुरुवात केली.

कार्यक्रम बाब क्र.1 :– प्राधिकरणाच्या 74 व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

प्राधिकरणाच्या 74 व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्याचे संदर्भात मा.सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी पाठविलेल्या पत्रात, 74 व्या सभेतील कार्यक्रम बाबी क्र.15,16,17 व 18 या बहुमताने नामंजूर झालेल्या असूनही त्या मंजूर झाल्याचा उल्लेख इतिवृत्तात आहे असे नमूद करुन अशी चूक करणा–या संबंधित कर्मचा–याविरुध्द कारवाई करण्यांत यावी अशी विनंती केल्याचे सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सभेस सांगितले. सदरचे पत्र प्राधिकरणाच्या 75 व्या सभेचे निमंत्रण पत्र पाठविण्यापूर्वी न आल्याने याबाबत सविस्तर निवेदन आयत्या वेळची कार्यक्रम बाब म्हणून सादर केली असल्याचे सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी प्रतिपादन केले.

त्याबाबत मा.अध्यक्ष महोदयांनी कार्यक्रम बाबींचे इतिवृत्त बरोबर असल्याचे सांगून, प्राधिकरणाच्या वेगवेगळया अधिका–यांना जे अधिकार प्रदान केलेले आहेत त्यानुसार त्यांनीच पुढची कार्यवाही करणे योग्य आहे असे सांगितले. श्री.माधव कुलकर्णी, सदस्य, यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, प्राधिकरणातर्फे करावयाच्या कामांची सविस्तर माहिती प्राधिकरणाच्या सभेपुढे सादर करण्यास काय हरकत आहे? यावर मा.उपाध्यक्ष यांनी असे सूचित केले की, प्राधिकरणाने करावयाच्या प्रत्येक कामांची सविस्तर माहिती प्राधिकरणाच्या सभेमध्ये सादर करण्याची नवीन प्रथा पाडणे बरोबर होणार नाही. कारण त्यामुळे प्राधिकरणाच्या अधिका–यांमध्ये अविश्वासाची भावना निर्माण होण्याची शक्यता आहे. तथापी एखाद्या विशिष्ठ प्रकरणी अशाप्रकारची कार्यवाही करण्यास हरकत नाही. या अनुषंगाने असे ठरले की, प्राधिकरणाच्या 74 व्या सभेतील कार्यक्रम बाब क्र. 15,16,17 व 18 या सर्व कामांची सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन ती प्रथम प्राधिकरणापुढे सादर करावीत व त्यास मंजुरी मिळाल्यानंतरच कामांच्या निविदा काढून पुढील कार्यवाही करावी.

याच अनुषंगाने असाही मुद्दा उपस्थित करण्यांत आला की, प्राधिकरणाच्या सभेच्या कार्यक्रमाची सूची सर्व सन्माननीय सदस्यांना पुरेसा काळ आधी मिळत नाही. त्यामुळे कार्यक्रम बाबींचा सविस्तर/ सखोल अभ्यास करणे शक्य होत नाही. या अनुषंगाने मा.अध्यक्षांनी असे आदेश दिले की, यापुढे प्राधिकरणाच्या सभेची कार्यक्रम सूची प्रत्येक सदस्याला सभेच्या दिवसाच्या किमान 8 दिवस आधी प्राप्त होईल असे प्रशासनाने बघावे..

त्यानंतर प्राधिकरणाच्या 74 व्या सभेच्या इतिवृत्तास (कार्यक्रम बाब क्र.15,16,17 व 18 च्या संदर्भात वर उल्लेख केलेला बदल करुन) मान्यता देण्यांत आली.

कार्यक्रम बाब क्र.2 :– प्राधिकरणाच्या 74 व्या सभेतील बाबींवर करण्यांत आलेली कृती सदस्य सचिवांनी वाचून दाखविली.

त्यानंतर खालीलप्रमाणे सविस्तर चर्चा काही बाबींवर झाली.

74 व्या सभेतील कार्यक्रम बाब क्र.8 : सुरेंद्र इंजिनियरींग कंपनीचा क्लेम :

याबाबत सदर कार्यक्रम बाब अद्याप तयार झालेली नसल्यामुळे ती प्राधिकरणाच्या सभेपुढे सादर करण्यांत आली नाही असे सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सांगितले.

विटा पाणी पुरवठा योजनेचे काम मे. सुरेंद्र इंजिनियरींग कंपनीकडून करण्यांत येत असून हे काम मागे पडलेले आहे याची जाणीव मे.सुरेंद्र इंजिनियरिंग कंपनीला देण्यात यावी व त्यांना समज देऊन हे काम लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत असे आदेश मा.अध्यक्ष महोदयांनी दिले.

कार्यक्रम बाब क्र.13, कार्यक्रम बाब क्र.20, टेबल कार्यक्रम बाब क्र.2 बाबत आवश्यक ते प्रस्ताव शासनाकडे लवकरच सादर करण्यांत येत आहेत असे सदस्य सचिवांनी सांगितल्यावर याबाबत कार्यवाही करण्यास उशीर कां होत आहे याची चौकशी मा. उपाध्यक्षांनी केली असता, प्राधिकरणाच्या 74व्या सभेचे इतिवृत्त नुकतेच मंजुर झाले असून, आता कार्यवाही होत आहे असे सदस्य सचिव ( तांत्रिक ) यांनी सांगितले.

याच संदर्भात अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी राष्ट्रीय नवी कृती योजनेच्या संदर्भात नुकत्याच, केंद्र शासनाच्या अपर सचिव श्रीमती मालती सिन्हा या मुंबईला येऊन गेल्याचे सांगून, ज्या 4 योजनांचे प्रस्ताव प्राधिकरणाकडून सादर करण्यांत आले आहेत त्यास 15 नोव्हेंबर, 1997 पर्यंत मंजुरी देण्यांत येईल असे श्रीमती मालती सिन्हा यांनी सदर भेटीच्या वेळी सांगितल्याचे सभेस सांगितले. याच बाबीवर चर्चा करतांना मा. उपाध्यक्षांनी असा मुद्दा उपस्थित केला की, राष्ट्रीय नवी कृती योजना राबविण्याचे काम प्राधिकरणाकडे देण्यात आलेले असून या संपूर्ण कार्यक्रमावर संनियंत्रण करण्याचे काम मात्र पर्यावरण विभागाकडे देण्यांत आलेले आहे हे योग्य वाटत नाही. त्यांनी पुढे असे सुचविले की, प्राधिकरणाच्या आजच्या सभेत "राष्ट्रीय नवी कृती योजनेच्या संनियंत्रणाचे काम पर्यावरण विभागाकडून काढून ते पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे सुपूर्द करावे" असा ठराव करुन तो शासनाकडे मंजुरीसाठी सादर करावा. वरील प्रमाणे ठराव " आयत्या वेळचा ठराव " म्हणू सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

टेबल कार्यक्रम बाब क्र.1 : सिमेंटचा पुरवठा करण्यासाठी दर करार –

मागील सभेत चर्चील्या गेलेल्या वरील कार्यक्रम बाबीबाबत मा. अध्यक्षांनी अशी विचारणा केली की, प्रस्तुत प्रकरणी काय कार्यवाही करण्यांत आलेली आहे. यावर अधीक्षक अभियंता ( मुख्यालय ) यांनी असा खुलासा केला की, पुढील वर्षात वेगवेगळया कामांवर एकूण किती सिमेंट लागणार आहे याची माहिती मागविण्यांत आलेली असून ब–याच क्षेत्रीय अधिका–यांकडून ही माहिती प्राप्त झालेली असून त्याचे संकलन करण्याचे काम चालू आहे. सर्व क्षेत्रीय अधिका–यांची माहिती प्राप्त झाली की मागील सभेत ठरल्याप्रमाणे सिमेंटचा पुरवठा थेट तालुका स्तरावर करण्यासाठी सिमेंट उत्पादक कंपन्यांकडून निविदा बोलविण्यांत येतील.

वेगवेगळया कामांवर लागणा–या सिमेंटचा पुरवठा सध्या कसा केला जातो अशी पृच्छा मा.अध्यक्ष महोदयांनी केली. यावर असा खुलासा करण्यांत आला की, राज्य शासनाच्या पाटबंधारे विभागाने वेगवेगळया सिमेंट उत्पादकांच्या सिमेंट उत्पादकांच्या सिमेंट पुरवठयाचे ( Ex-factory ) दर ठरविलेले असून त्या दरानुसार प्रत्येक फॅक्टरी पासुन जवळातजवळ असलेल्या प्राधिकरणाच्या वेगवेगळया कार्यालयांसाठी आवश्यक असलेल्या सिमेंट पुरवठयाचे आदेश संबंधित मुख्य अभियंता हे देतात. सदर खुलासा केल्यानंतर सध्याचीच सिमेंट विकत घेण्याची पध्दत चालू ठेवावी अशा सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या.

टेबल कार्यक्रम बाब क्र.5 : अहमदनगर पाणी पुरवठा योजना : वाढीव कर्मचारीवृंद नेमणे व नगरपरिषदेस हस्तांतरण.

या कार्यक्रम बाबीबाबत मुख्य अभियंता, नाशिक यांनी प्राधिकरणाकडून सदर योजना हस्तांतरित करण्याबाबत सतत पाठपुरावा करण्यांत येत असल्याचे सभेस सांगितले. त्यावर या योजनेवर कार्यरत असलेल्या सर्वच्या सर्व कर्मचारीवृंदांसह ही योजना हस्तांतर करुन घेण्यास नगरपालिका तयार आहे किंवा कसे याची विचारणा मा.अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष यांनी केली. याबाबत मुख्य अभियंता, नाशिक यांनी असे

सांगितले की, सर्व कर्मचारीवृंदांसह योजना ताब्यात घेण्यास नगरपालिका तयार आहे. प्रथमतः सप्टेंबर, 97 रोजी सदर योजना ताब्यात घेण्याचे ठरविले होते, परंतु काही अपरिहार्य अडचणींमुळे सदर योजना आता दि. 1.11.97 रोजी ताब्यात घेण्यास नगरपालिका तयार आहे असे सांगण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.3 : राज्यातील नागरी तथा ग्रामीण भागात पाणी पुरवठा उपलब्ध करुन देणे.**

मूळ कार्यक्रम बाबीमध्ये काही गोष्टींची स्पष्टता नाही असे आढळल्याने व ही कार्यक्रम बाब या पूर्वी जुलैमध्ये झालेल्या सभेत सादर झाल्यावर नव्याने काही माहिती प्राप्त झाली असल्याने अधीक्षक अभियंता, म.नि.सं. व सं. यांनी नव्याने माहिती सादर केली. ही माहिती सादर करताना त्यांनी असा खुलासा केला की, ग्रामीण क्षेत्रातील योजना तयार करण्याबाबत मंत्रीमहोदयांच्या अपेक्षेप्रमाणे कार्यवाही झालेली नाही हे खरे असलेतरी परिस्थिती तितकीशी वाईट नाही आणि अलिकडे त्यात सातत्याने सुधारणा होत आहे.

यावर मंत्रीमहोदयांनी असे मत व्यक्त केले की, योजना वेळेवर तयार करण्याबाबत कार्यवाही होत असेल तर उत्तमच, पण त्यांच्या माहितीनुसार ज्या योजनांना अधिक (3–4 वर्षे) कालावधी लागणार आहे, अशा योजना लवकरात लवकर तयार करुन मंजूर करुन घेऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्याबाबत फारशी प्रगती झालेली नाही. शासनाने जाहीर केलेल्या धोरणानुसार 2000 सालापर्यंत कोणत्याही खेड्याला टँकरने पाणी पुरवठा करावा लागणार नाही, अशी व्यवस्था होणे आवश्यक आहे. त्यांनी असाही अभिप्राय व्यक्त केला की, निधी वेळेवर उपलब्ध होत नाही, तसेच मंजूर नियतव्यय वाढविण्यांत आला नाही आणि म्हणून हा कार्यक्रम यशस्वी होण्याबाबत अडचणी येण्याची शक्यता आहे. असा क्षेत्रीय अधिका–यांचा समज झालेला दिसतो. तथापि निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्न तर करण्यांत येत आहेतच आणि हा वाढीव निधी एकदम मिळणे शक्य नसून, विविध वित्तीय यंत्रणांकडून जसजसा प्राप्त होईल तसतसा तो मिळू शकेल. तेव्हा प्रत्यक्ष वाढत्या प्रमाणात निधी उपलब्ध आहे किंवा कसे याची काळजी न करता जास्तीत जास्त योजना तयार करुन त्या मंजूर करुन ठेवणे आवश्यक आहे.. जेणेकरुन उपलब्ध निधीत वाढ होताच वाढीव प्रमाणात योजनांची कामे सुरु करता येतील.

योजना तयार करण्याबाबत बरीच कामगिरी झालेली आहे. या मुद्द्यावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव यांनी अशी सूचना केली की, योजना तयार करण्याच्या संदर्भात जिल्हानिहाय माहिती त्यांचेकडे पाठविण्यांत यावी, जेणेकरुन योजना तयार करण्याबाबत कोणता जिल्हा पुढे आहे व कोणता जिल्हा मागे आहे याची कल्पना येईल व त्यानुसार कार्यवाही करता येईल.

काही प्रकारणी योजना तयार करण्याजोगी परिस्थिती असली तरी, पाटबंधारे विभागाची अनुमती न मिळणे, उद्भवाबाबत प्रमाणपत्र न मिळणे, यामुळे योजना तयार असूनही प्रत्यक्षात शासनास सादर होण्यात अडचणी येत आहेत. या संदर्भात पाटबंधारे विभागाकडे वरिष्ठ स्तरावर प्रयत्न करावे लागतील असे अभिप्राय व्यक्त करुन, मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी अशा प्रकरणी जिल्हानिहाय माहिती त्यांचेकडे सादर करण्यांत यावी म्हणजे त्याबाबत कार्यवाही करता येईल असे स्पष्ट केले.

चर्चेच्या ओघात असे मत व्यक्त करण्यांत आले की, 2000 सालापर्यंत सर्वांना पिण्याचे पाणी पुरवठा करण्याचा प्रचंड कार्यक्रम हाती घेण्यांत आला असतांना प्राधिकरणाच्या अधिका–यांमध्ये काहीशी मरगळ आलेली दिसते. मा.अध्यक्षांनी यावर असा अभिप्राय व्यक्त केला की, असे म्हणणे योग्य होणार नाही. व अधिका–यांकडून अधिक मोठया प्रमाणावर कामगिरीची अपेक्षा आहे हे खरे असले तरी गेल्या 2–3 वर्षात ब–याच मोठया प्रमाणावर कामे झाली आहेत. त्यातील काही चांगलीही झालेली आहेत. तेव्हा अशा

परिस्थितीत त्यांच्यात मरगळ आलेली आहे असे म्हटल्यास या अभियंत्यांच्या मनोधैर्यावर परिणाम होईल. आणि ते उचित होणार नाही असेही मत अध्यक्षांनी व्यक्त केले.

योजनांच्या आढाव्यांच्या संदर्भात मा.अध्यक्षांनी असे सूचित केले की, शासनातर्फे गेल्या वर्षापासुन दरवर्षी काही टँकरने पाणी पुरवठा होणारे जिल्हे टँकरमुक्त करण्याचे ठरविण्यांत आले आहे. मागील वर्षी आणि या वर्षी ज्या जिल्हयांना टँकरमुक्त करण्याचे ठरविण्यांत आले त्या जिल्हयांची नांवे कळविण्यास थोडा उशीर झाल्याने अशा जिल्हयातील आवश्यक ती कामे योग्य वेळी चालू करुन पूर्ण करण्यास प्राधिकरणाच्या अधिका–यांस पुरेसा वेळ मिळालेला नाही. परंतु पुढील वर्षी अशी अडचण येऊ नये म्हणून 1998–99 या सालात जे जिल्हे टँकरमुक्त करावयाचे त्यांची नांवे शासनातर्फे लवकरात लवकर जाहीर करण्यांत येतील. जेणेकरुन संबंधित जिल्हयातील आवश्यक त्या योजनांची कामे प्राधान्याने हाती घेणे प्राधिकरणाच्या क्षेत्रीय अधिका–यांस शक्य होईल.

अशाप्रकारे या कार्यक्रम बाबीद्वारे सादर करण्यांत आलेल्या माहितीची प्राधिकरणाने नोंद घेतली.

**<u>कार्यक्रम बाब .4 : प्राधिकरणातील विभागीय लेखापालांना पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे कार्यरत असलेल्या विभागीय लेखापालांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करणेबाबत.</u>**

याबाबत शासनाच्या पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभागात असलेले विभागीय लेखापाल हे केंद्र शासनाचे कर्मचारी आहेत. परंतु प्राधिकरणाकडे असलेले विभागीय लेखापाल हे केंद्र शासनाचे कर्मचारी नसल्याने प्राधिकरणात एका ठराविक संवर्गाला केंद्र शासनाची वेतनश्रेणी लागू करणे हे योग्य होणार नाही असे प्रतिपादन मा.सदस्य श्री. पटवर्धन यांनी केले. त्यानंतर सर्वानुमते हा ठराव नामंजूर करण्यांत आला.

**<u>कार्यक्रम बाब क्र.5 : सावदा वाढीव पाणी पुरवठा योजना. – आवक विहिर, जोड पाईपलाईन, पंपगृह, उध्दरण विहिर व 273 मि.मि. व्यासाची पोलादी पाईपांची उध्दरण नलिका विद्युतची अशुध्द व शुध्द पाण्याची सर्ववाहिनी वितरण व्यवस्था इ. कामाच्या निविदा स्विकृतीबाबत.</u>**

या कार्यक्रम बाबीवर चर्चा करतांना मा.सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी प्राधिकरणाच्या काही अधिका–यांकडून निविदा सूचनांची व्यापक प्रसिध्दी केली जात नाही आणि त्यामुळे निविदा या एक किंवा दोन ठेकेदार विकत घेतात व येणारे देकार खूप जास्त असतात असे नमूद केले. या अनुषंगाने त्यांनी कोल्हापूर जिल्हयातील एक स्थानिक वृत्तपत्र " समाज " मध्ये प्रसिध्द झालेल्या एका जाहिरातीची प्रत मा.अध्यक्षांना सादर केली. ही जाहिरात अधिकृत जाहिरात वितरण प्रतिनिधीनी त्या वर्तमानपत्रात दिली की संबंधित अधिका–यांनी परस्पर त्या वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी दिली याची चौकशी करावी, त्याचप्रमाणे या जाहिरातीची देयके किती रकमेची प्राप्त झाली आहेत त्याचीही माहिती प्राधिकरणापुढे सादर करावी असे त्यांनी सुचविले. कारण सदर वृत्तपत्राचा खप हा अतिशय मर्यादित असून अशा वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या निविदा सूचनांना मिळणारा प्रतिसाद हा अत्यल्प असणार हे उघड आहे. याच अनुषंगाने वृत्तपत्रात प्रसिध्द होणा–या निविदा सूचनांवर दरवर्षी किती खर्च करण्यांत येतो याची गेल्या काही वर्षाची माहिती क्षेत्रीय अधिका–यांकडून प्राप्त करुन घेऊन ती प्राधिकरणापुढे सादर करावी अशाही सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. याच अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने जनसंपर्क खात्यामार्फत प्राधिकरणाच्या जाहिराती प्रसिध्दीस दिल्यास त्या जाहिराती सवलतीच्या दरात छापून मिळू शकतील असे सदस्य सचिव (प्रशासन) यांनी सुचविले असता अशाप्रकारचे काम करण्यास शासनाचे जनसंपर्क खाते तयार नाही अशी माहिती देण्यांत आली.. तरीदेखील पुन्हा एकदा शासनाच्या जनसंपर्क खात्याकडे याबाबत विचारणा करावी असे ठरले.

तसेच यापुढे निविदा सूचनेची एक प्रत संबंधित क्षेत्रीय अधिका–यांनी प्राधिकरणाच्या सर्व अशासकीय सदस्यांकडेही पाठवावी असे ठरले.

याच अनुषंगाने मा.सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी " दैनिक पुढारी " या वृत्तपत्रात दि. 2.10.97 रोजी प्रसिध्द झालेल्या सासवड पाणी पुरवठा योजनेच्या भूमिपूजन समारंभाच्या पूर्णपानाची जाहिरात सभेला वाचवून, एवढी मोठी जाहिरात कोणी प्रसिध्दीस दिली अशी विचारणा केली. श्री..माधव कुलकर्णी यांनी याच संदर्भात असेही नमूद केले की, ते प्राधिकरणाचे पुणे विभागातीलच सदस्य असून देखील त्यांना वरील कार्यक्रमाचे रितसर निमंत्रण देण्यांत आले नाही, तसेच त्यांच्या नावाचा उल्लेखही सदर जाहिरातीत केला गेलेला नाही. याबाबत असा खुलासा करण्यांत आला की, अशा प्रकारची कोणतीही जाहिरात प्राधिकरणाच्या अधिका–यांकडून देण्यांत आलेली नसून प्रस्तुत जाहिरात देखील सासवड नगरपालिकेने त्यांच्या खर्चाने प्रसिध्दीस दिलेली आहे. याच विषयावर चर्चा चालू असतांना मा.अध्यक्षांनी असे सुचविले की, प्राधिकरणाच्या जाहिरातींची प्रसिध्दी योग्य अशा वर्तमानपत्रातच होण्यासाठी किती रकमेच्या कामाच्या निविदा सूचना कोणत्या प्रकारच्या वर्तमानपत्रामध्ये (खपाच्या निकषानुसार) द्याव्यात याबाबत प्राधिकरणाने माहिती गोळा करुन मार्गदर्शक सूचना प्राधिकरणाच्या अधिकृत जाहिरात प्रतिनिधींना तसेच प्राधिकरणाच्या सर्व क्षेत्रीय अधिका–यांना देण्याचाही विचार करावा.

याच बाबतीत चर्चा करीत असतांना मा.सदस्य श्री.सरदेशपांडे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, काही प्रकरणी प्राधिकरणाच्या अधिका–यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही झालेली असते, त्याच्याबाबतची माहिती प्रशासनाने प्राधिकरणाच्या सभेपुढे सादर करावी. याबाबत मा.उपाध्यक्षांनी असे सांगितले की, असे करणे योग्य होणार नाही. परंतु एखाद्या विशिष्ठ प्रकरणाची माहिती जर मागविण्यांत आली तर ती मात्र मा.अध्यक्षांच्या परवानगीने प्रशासनाने प्राधिकरणाच्या सभेपुढे सादर करणे योग्य ठरेल .

मा.सदस्य श्री.सरदेशपांडे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, नागपूर, चंद्रपूर व भंडारा येथील प्राधिकरणाच्या अधीक्षक अभियंत्यांच्या कार्यक्षेत्रातील काही कामांना त्यांनी भेटी दिलेल्या आहेत, परंतु या सर्व भेटी पूर्ण झालेल्या कामांवरच आयोजित करण्यांत आल्या होत्या. वस्तुतः जी कामे प्रगतीपथावर आहेत ती कामे योग्य दर्जाने व निविदेतील तरतुदीनुसार चालू आहेत किंवा नाहीत हे सदस्यांनी बघणे जास्त महत्वाचे असल्याने अशाप्रकारच्या प्रगतीपथावरील कामांना सदस्यांच्या भेटी संबंधितांनी आयोजित कराव्यात अशा सूचना प्रशासनाने सर्व क्षेत्रीय अधिका–यांना द्याव्यात असे त्यांनी सुचविले.

प्राधिकरणाच्या सदस्यांनी वेगवेगळया कामांना भेटी दिल्यानंतर त्यांना त्यांचे अभिप्राय नोंद करता यावेत या उद्देशाने प्रत्येक कामावर अभ्यागत पुस्तिका ( Visiters Book) ठेवावी व प्राधिकरणाच्या सदस्यांनी भेटीच्या वेळी सदर अभ्यागत पुस्तिकेत केलेल्या नोंदी संबंधित क्षेत्रीय अधिका–यांनी खास दुतामार्फत तीन दिवसांचे आंत सदस्य सचिवांचे कडे सादर कराव्यात, जेणेकरुन उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत आवश्यक ती कार्यवाही सदस्य सचिव करु शकतील अशा सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या.

मा.सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी सभेच्या असे निदर्शनास आणून दिले की, प्राधिकरणाच्या सांगली मंडळ कार्यालयातर्फे एकाच दिवशी एकाच ठेकेदारास 3 निविदांची कामे देण्यांत आली आहेत. याबाबत सविस्तर माहिती प्राप्त करुन घेऊन कामांचे वाटप हे नियमानुसारच केलेले आहे याची खात्री करुन घ्यावी.

सायखा पाणी पुरवठा योजनेच्या पाच्यांदा बोलाविलेल्या निविदेलाही अत्यल्प प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आल्याने आणि आलेल्या देकार देखील खूप जास्त व तोही एकाच ठेकेदाराकडून प्राप्त झालेला असल्याने सदर निविदा अस्वीकृत करण्यांत आली.

या कामांची पुन्हा निविदा बोलावून त्यावेळी पुरेसा प्रतिसाद मिळावा म्हणून योग्य अशा वर्तमानपत्रातून त्यांची पुरेशी व्यापक प्रसिध्दी होईल असे बघावे. त्याचबरोबर प्राधिकरणाच्या जळगांव येथील मंडळ कार्यालयांतर्गत विविध ठेकेदारांना देखील निविदा सूचनेच्या प्रती पाठविण्यांत याव्यात असे आदेश मा. अध्यक्षांनी दिले.

सदर निविदा पत्राची 1–1 प्रत प्राधिकरणाच्या तांत्रिक सदस्यांनाही पाठवावी असे ठरले.

या विषयावर चर्चा चालू असतांनाच कामांचा दर्जा तपासण्यासाठी प्राधिकरणामध्ये काय व्यवस्था आहे अशी पृच्छा सदस्यांनी केली. या संदर्भात असा खुलासा करण्यांत आला की, प्राधिकरणामध्ये स्वतंत्र गुण नियंत्रण कक्ष असून या कक्षातर्फे करण्यांत आलेल्या तपासणीचे अहवाल अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण कक्ष थेट सदस्य सचिवांना सादर करतात व प्राप्त झालेल्या अहवालानुसार आवश्यक ती विभागीय चौकशीसारखी कार्यवाही सुरु करण्याचे आदेश सदस्य सचिव देतात.

याबाबत श्री.सरदेशपांडे, सदस्य यांनी असे सूचित केले की, याबाबत गुण नियंत्रण कक्षाच्या काही अधिका–यांकडे काम थांबविण्यासारखे काही अधिकार त्यांना आहेत काय अशी चौकशी त्यांनी केली असता तसे अधिकार नसल्याचे सांगण्यांत आले. म्हणजेच गुण नियंत्रण कक्षाचे काम हे पूर्ण झालेली कामे योग्य केली गेली आहेत किंवा नाहीत हे पाहण्यासारखेच आहे. परंतू काम चालू असतानाच वक्ता म्हणून काही कामे बंद करणे आवश्यक असल्यास त्याबाबतचे अधिकार संबंधितांना देण्याचाही विचार करण्याची गरज आहे.. याबाबत सदस्य श्री.पटवर्धन यांनी असे सूचित केले की, अशा प्रकारचे अधिकार गुण नियंत्रण कक्षाच्या अधिका–यांस दिले तर त्याचा गैरवापर होण्याची शक्यता लक्षात घेऊन अशा प्रकारचे अधिकार देणे योग्य होणार नाही.

कामावर वापरण्यांत येणारे साहित्य योग्य त्या दर्जाचे असावे म्हणून त्रयस्थ यंत्रणेमार्फत अशा सर्व सामानाची तपासणी सामान कामावर येण्यापूर्वी केली जाते. परंतू अतिशय थोडया प्रमाणात लागणा–या सामानाची (उदा. पाण्याच्या टाकीचे इनलेट आऊटलेट पाईप्स् , व्हॉल्वज् इ.) तपासणी केली जात नाही असे श्री.सरदेशपांडे, सदस्य, यांनी निदर्शनास आणून दिले. याबाबत असा खुलासा करण्यांत आला की, त्रयस्थ यंत्रणा एक ठराविक कमीत कमी फी तपासणी करण्यासाठी आकारतात व ब–याच वेळा वस्तुंच्या किमतीपेक्षा तपासणी फी जास्त अशी स्थिती उद्भवते आणि अशा स्थितीत क्षेत्रीय अधिकारी वरिष्ठ अधिका–यांच्या पूर्व परवानगीने त्रयस्थ यंत्रणेतर्फे होणारी तपासणी न करता सदर साहित्य स्वतः तपासून कामावर वापरतात. बहुतेक त्रयस्थ यंत्रणांना दूर अंतरावरुन तपासणीसाठी जावे लागत असल्याने त्यांचे मार्फत आकारण्यांत येणारे कमीत कमी दर हे देखील खूपच जास्त असतात.

या अनुषंगाने मा.अध्यक्षांनी असे सुचविले की, याबाबत सर्वकष विचार करुन काही जिल्हास्तरावरील अभियांत्रिकी महाविद्यालये अथवा तत्सम यंत्रणांना हे तपासणीचे काम देण्याच्या शक्यतेचा विचार करण्यांत यावा. तसेच किती किंमतीपर्यंतच्या आणि कोणत्या प्रकारच्या साहित्याची त्रयस्थ यंत्रणांतर्फे होणारी तपासणी टाळता येऊ शकेल याबाबत विचार करुन काही नवीन निकष प्रस्तावित करणे शक्य असल्यास त्याचाही विचार करावा.

**<u>कार्यक्रम बाब क्र.6 : मिठापासून क्लोरिन वायू तयार करुन पाणी पुरवठा योजनेत निर्जंतुकीकरणासाठी वापर.</u>**

मिठापासून क्लोरिन वायू तयार करुन पाणी पुरवठा योजनेत निर्जंतुकीकरणासाठी वापर करण्याच्या वरील कार्यक्रम बाबीवर चर्चा करतांना मा.,अध्यक्षांनी असे सुचविले की, या नवीन प्रकारच्या यंत्रणेचा प्रायोगिक तत्वावर वापर करणेदेखील अतिशय खर्चिक असल्याने त्याचा विचार करु नये. या प्रस्तावास सर्वांनी मान्यता दिल्याने सदर कार्यक्रम बाब नामंजूर करण्यांत आली.

**<u>कार्यक्रम बाब क्र.7 : प्राधिकरणाच्या लेखापरिक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचेकडे सोपविणेबाबत – कालावधी 1.9.97 ते 31.3.2002.</u>**

प्राधिकरणाच्या लेखापरिक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचेकडे 1.4.1997 ते 31.3.2002 या कालावधीसाठी सोपविण्याच्या प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली.

**<u>कार्यक्रम बाब क्र.8 : नागरी भागाकरिता कमी खर्चाची स्वच्छता योजना – वैयक्तिक शौचकूप बांधकामाकरिता हुडकोकडून रु. 617.63 लाख कर्ज उभारणेस प्राधिकरणाची मंजुरी मिळणेबाबत.</u>**

या कार्यक्रम बाबीवर चर्चा करतांना मा.मंत्रीमहोदयांनी असे सूचित केले की, महा.जीवन प्राधिकरण नगरपालिकांच्या वतीने कर्ज उभारते. अशा कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी जरी नगरपालिकांची / महानगरपालिकांची असली तरी प्रत्यक्षात अशा कर्जाच्या परतफेडीबाबत कोणतीही कार्यवाही संबंधित नगरपालिका करीत नाहीत. परंतू अशा कर्जांच्या परतफेडीची हमी शासनाने दिली असल्यामुळे शासनाच्या आदेशानुसार प्राधिकरणास कर्ज परतफेडीचे हप्ते भरावे लागतात. प्राधिकरणास प्रत्यक्षात कर्ज फेडीचे पैसे नगरपालिकांकडून न मिळाल्यामुळे ज्या रकमा कर्ज फेडीसाठी प्राधिकरण भरते त्या प्रत्यक्षात इतर योजनांच्या अनुदानासाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीमधून दिलेल्या असतात. ही वस्तुस्थिती पाहता अशा प्रकारच्या कुठल्याही कर्जाच्या परतफेडीची वेळच प्राधिकरणावर येऊ द्यावयाची नसेल तर अशाप्रकारच्या कर्ज उभारणीच्या प्रस्तावाचा विचार प्राधिकरणाने न केलेलाच बरा.

प्रस्तुत कार्यक्रम बाबींत हुडकोकडून कर्ज उभारण्याचे प्रस्तावित (नागरी भागाच्या कमी खर्चाच्या स्वच्छता योजनांतर्गत शौचकूप बांधकामासाठी आहे आणि या कार्यक्रम बाबीतील सविस्तर आकडेवारी पाहता या कर्जाव्यतिरिक्त शासनाचे अनुदान आणि हुडकोचे अनुदान लाभार्थींसाठी उपलब्ध होऊ शकते, त्यामुळे तेवढयाच खर्चात शौचकुप बांधण्याच्या शक्यतेचाही विचार करावा असे सुचविण्यांत आले. असे शक्य असेल तर लाभार्थीचा खर्चातील काही वाटा, हुडकोकडून मिळणारे अनुदान आणि शासनाकडून मिळणारे अनुदान एवढयाच रकमेत शौचकुपांचे बांधकाम करुन कर्ज उभारणी टाळता येऊ शकेल.

या कार्यक्रम बाबीवर चर्चा करतांना मा.उपाध्यक्षांनी असा मुद्दा उपस्थित केला की, या शौचकुपांच्या बांधणी कार्यक्रमात प्राधिकरणाची भूमिका फक्त निधी वितरणाचे माध्यम अशीच आहे आणि प्रत्यक्ष कामे मात्र संबंधित नगरपालिका किंवा लाभार्थी करीत असतात. शासनाचा नागरी भागातील कमी खर्चाची स्वच्छता योजना लागू करण्यामागचा उद्देश लक्षात घेता असाही विचार करण्यास हरकत नाही की, कोणत्याही लाभार्थीने कोणत्याही प्रकारच्या शौचकुपाचे (Two pit Latrine or Septic Tank ला जोडलेले शौचकूप) बांधकाम केले तर झालेले काम प्रत्यक्ष पाहून काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक

लाभार्थीला नियमानुसार देय असलेली रक्कम वाटप करता येणे शक्य आहे किंवा कसे याबाबी विचार व्हावा. या अनुषंगाने तशाप्रकारचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा असे ठरले.

या संदर्भात मा.अध्यक्षांनी असे नमूद केले की, राज्यातील बहुसंख्य नगरपालिकांची आर्थिक स्थिती त्यांचे उत्पन्न अत्यंत मर्यादित असल्याने, अतिशय कमकुवत असते. त्यामुळे पाणी पुरवठा योजनांसाठी तसेच कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यास त्या नगरपालिका सक्षम नसतात. त्यामुळे वर उल्लेख केल्याप्रमाणे कमी खर्चाच्या स्वच्छता योजनेसाठी कर्ज न घेता काम करणे शक्य झाल्यास या कार्यक्रमास ख–या अर्थाने गती मिळू शकेल.

त्यानंतर वर अुल्लेख केल्याप्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करावा असे ठरले.

**<u>कार्यक्रम बाब क्र.9 : वसमत सुधारित पाणी पुरवठा योजना (जिल्हा परभणी) प्रशासकीय मान्यता व शासकीय अनुदानाची मंजुरी अनियमिततेबाबत कार्यवाही.</u>**

या कार्यक्रम बाबीवर चर्चा करतांना असे स्पष्ट करण्यांत आले की, वसमत पाणी पुरवठा योजनेवर मंजूर रकमेपेक्षा जास्त खर्च करण्यांत आला (सुधारित मान्यता मिळण्यापूर्वी) हे खरे असले तरीही सुधारित योजनेची अंदाजपत्रके कामावरील खर्च मूळ मंजूर रकमेपेक्षा कमी असतानाच शासनास सादर केली गेली होती. या बाबीकडेही दुर्लक्ष करणे योग्य होणार नाही. याशिवाय सदर योजना कार्यान्वित करण्यांत आली असून पाणी पुरवठाही सुरळीत चालू आहे याही बाबीकडेही दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता शासनास याबाबत सविस्तर कळवून प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिका–यावर याबाबत कार्यवाही करण्यात येऊ नये असे प्राधिकरणाचे मत असल्याचे कळविण्यांत यावे असे ठरले.

या संदर्भात मा.सदस्य श्री.आदिनाथ नवले पाटील यांनी असे सूचित केले की, प्राधिकरणाच्या काही अधिका–यांच्या बाबतीत असे दिसते की, त्या अधिका–यांवर कनिष्ठ पदावर काम करीत असतांना त्यांचेकडून झालेल्या अनियमिततेबाबत विभागीय चौकशी चालू असूनही अशा अधिका–यांच्या पदोन्नतीनंतर त्यांना पुन्हा त्याच ठिकाणी पदस्थापित केलेले आहे. अशा परिस्थितीत पदोन्नतीनंतर आपल्या विरुध्द असलेले पुरावे नष्ट करण्याची संधीच संबंधितांना दिल्यासारखी आहे. त्यांना अशाप्रकारे पदस्थापना करण्यात येऊ नयेत असेही त्यांनी सुचविले.

वरील बाबीबाबत सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी असा खुलासा केला की, सर्वसामान्यपणे वर उल्लेख केलेल्या परिस्थितीमध्ये पदोन्नती दिलेल्या अधिका–याला त्याच ठिकाण शक्यतो पदस्थापित करण्यात येत नाही, अर्थात काही अपवादात्मक परिस्थितीतच तसे करणे अपरिहार्य ठरते. मा.सदस्यांनी ज्या प्रकरणांचा या संदर्भात उल्लेख केला आहे ती दोन्ही प्रकरणे अशाच अपवादात्मक परिस्थितीमुळे उद्भवलेली प्रकरणे आहेत.

याच विषयावर अपर मुख्य सचिव यांनी असे सूचित केले की, पदोन्नतीसाठी अधिका–यांची नांवे ठरवितांना ज्या समितीपुढे अधिका–यांची संपूर्ण माहिती सादर केली जाते त्या समितीस जर एखाद्या अधिका–याचे बाबतीत काही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू असेल किंवा प्रस्तावित असेल तर ही बाब स्पष्टपणे नमूद करण्यांत यावी आणि ज्या प्रकरणात विभागीय चौकशी चालू आहे किंवा प्रस्तावित आहे ती प्रकरणे सदर अधिकारी कोणत्या ठिकाणी कार्यरत असतानाची आहेत ही बाबही स्पष्ट करावी. असे केल्यास पदोन्नतीनंतर संबंधित अधिका–याची पदस्थापना करतांना ज्या ठिकाणी जुन्या प्रकरणातील

कागदपत्रे त्यांना सहजगत्या उपलब्ध होऊ शकणार नाहीत अशा ठिकाणी त्यांची पदस्थापना करणे शक्य होईल.

पदोन्नतीच्या संदर्भात ज्या अधिका–यांविरुध्द विभागीय चौकशी चालू आहे अशा अधिका–यांना पदोन्नती देता येते किंवा कसे याबाबतची पृच्छा सभेत करण्यांत आली. याबाबत असा खुलासा करण्यांत आला की, जेव्हा एखाद्या अधिका–याविरुध्द अति गंभीर स्वरुपाचे आरोपासाठी विभागीय चौकशी चालू आहे अशा प्रकरणी संबंधित अधिका–यास पदोन्नती देण्यांत येत नाही. परंतू ज्या अधिका–यांविरुध्द किरकोळ स्वरुपाच्या आरोपांखाली विभागीय चौकशी चालू आहे अशा प्रकरणी विभागीय चौकशी पूर्ण होण्यापूर्वी अशा अधिका–यास पदोन्नती देता येते.

**कार्यक्रम बाब क्र.10 : ब्रिटीश शासन अर्थसहाय्यीत महा.पाणी पुरवठा प्रकल्प — नांदगांव व 56 खेडयांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, जिल्हा–नाशिक, मे.इंडियन हयुम पाईप कंपनीच्या एस्कलेशन क्लेमबाबत.**

या कार्यक्रम बाबीवर चर्चा करतांना मा.सदस्य श्री..पटवर्धन व श्री.माधव कुलकर्णी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, संबंधित ठेकेदारास निविदेनुसार एस्कलेशन पोटी देयक देण्यांत आलेले असल्याने आणि कामे देखील निविदेनुसारच करण्यांत आलेली असल्याने एस्कलेशन पोटी कोणतीही जादा रक्कम देण्याचा विचार करु नये. वरील प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली व कार्यक्रम बाब नामंजूर करण्यांत आली.

वरील सर्व कार्यक्रम बाबींवरील चर्चेत खूपच वेळ गेल्याने मा.अध्यक्षांनी असे सूचित केले की, या पुढील सर्व कार्यक्रम बाबींवर आता चर्चा न करता या सर्व कार्यक्रम बाबी प्राधिकरणाच्या पुढील सभेत ठेवाव्यात व पुढील सभा ही नोव्हेंबर, 1997 महिन्याच्या पहिला आठवडयात शक्यतो घेण्यांत यावी. मा. अध्यक्षांनी वरीलप्रमाणे सूचना केल्यानंतर मुख्य अभियंता, जागतिक बँक कक्ष, यांनी सभेच्या असे निदर्शनास आणून दिले की, आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र. 3 अन्वये जागतिक बँक अर्थसहाय्याने हाती घ्यावयाच्या कामांच्या निविदेबाबत निर्णय घेण्यासाठी या सभेत चर्चा होणे आवश्यक आहे . कारण प्रस्तुत प्रकरणी सदर निविदेचा देकार खूप जास्त दराचा असल्याने तो न स्वीकारता पुन्हा निविदा बोलवाव्यात असे प्राधिकरणाने जागतिक बँकेस कळविल्यानंतरही जागतिक बँकेने नुकतेच असे कळविले आहे की, वरील निर्णयाचा प्राधिकरणाने फेरविचार करावा.

या कार्यक्रम बाबीत प्रस्तावित करण्यांत आलेल्या निविदेसाठी देकार फक्त दोनच ठेकेदारांकडून आले. त्यातील एका ठेकेदाराची निविदा नॉन–रिस्पॉन्सीव्ह (Non-Responsive) होती. त्यामुळे प्रस्तावित निविदा ही फक्त एकाच ठेकेदाराची आणि खूपच जास्त देकार असलेली आहे , ही बाब मुख्य अभियंता, जागतिक बँक यांनी स्पष्ट केल्यानंतर सर्वानुमते असे ठरले की, सदर निविदा न स्वीकारता निविदा पुन्हा बोलावण्यांत यावी आणि निविदा बोलवितांना वेळ वाचविण्यासाठी " अल्प निविदा सूचना " (Short Tender Notice) देण्यांत यावी. याशिवाय जे ठेकेदार निविदेअंतर्गत असलेल्या प्रकारची कामे करणारे ठेकेदार आहेत , अशा ठेकेदारांना सदर निविदा सूचना प्राधिकरणाच्या कार्यालयाकडूनच पाठविण्यांत यावी , जेणेकरुन निविदा सूचनेला जास्तीत जास्त प्रतिसाद मिळू शकेल.

सभा संपता–संपता मा. अध्यक्षांनी प्रशिक्षणार्थी अभियंत्यांच्या नोकरीबाबतचा प्रश्न आयत्या वेळची बाब म्हणून उपस्थित केला. जे अभियंते अभियांत्रिकी परिक्षा पास झाल्यानंतर " प्रशिक्षणार्थी अभियंता" म्हणून प्राधिकरणामध्ये एक वर्ष काम करतात अशा अभियंत्यांकडून त्यांना प्राधिकरणाच्या कायम सेवेत सामावून घ्यावे असे अर्ज येतात , त्यावर काय कार्यवाही करण्यांत येते हे जाणून घेण्यासाठी सदर बाब उपस्थित केल्याचे मा.मंत्रीमहोदयांनी स्पष्ट केले . या अनुषंगाने प्राधिकरणामध्ये अशाप्रकारचे किती प्रशिक्षणार्थी अभियंता होते/आहेत, प्रशिक्षण कामावधीत त्यांचे काम कसे होते. प्राधिकरणास कोणकोणत्या ठिकाणी किती अभियंत्यांची गरज आहे याची माहिती प्रशासनाने गोळा करावी व ती प्राधिकरणाच्या सभेत सादर करावी असे ठरले.

याबाबत असा खुलासा करण्यांत आला की, सहाय्यक अभियंता वर्ग–2 या संवर्गाच्या पदवीधारक अभियंत्यांची नेमणूक महा.लोकसेवा आयोगामार्फत करण्याची आवश्यक असल्याने जे प्रशिक्षणार्थी अभियंता प्राधिकरणात कार्यरत होते/आहेत त्यांना परस्पर प्राधिकरणाच्या कायम सेवेत सामावून घेणे शक्य होणार नाही.. अशाप्रकारे परस्पर सेवेत सामावून घ्यावयाचे असेल तर त्यास महा..लोकसेवा आयोगाची परवानगी घेणे आवश्यक ठरेल असेही स्पष्ट करण्यांत आले.

या अनुषंगाने सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी हेही निदर्शनास आणून दिले की, सर्वसाधारणपणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सहाय्यक अभियंता वर्ग–2 या संवर्गातील अभियंता भरतीसाठी परिक्षा घेऊन त्यांची निवडसूची करुन प्रत्यक्ष भरती करेपर्यंत सुमारे दोन वर्षाचा कालावधी जाईल व हाच कालावधी पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीचे संदर्भात अत्यंत महत्वाचा असल्याने तात्पुरत्या स्वरुपात आवश्यक त्या पदांची भरती करण्यासाठी महा. लोकसेवा आयोगाची परवानगी घेणे अत्यंत गरजेचे आहे. सदर परवानगी मिळविण्याच्या दृष्टीने प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी असे ठरले.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानल्यानंतर सभा समाप्त झाल्याचे घोषित करण्यांत आले.

sabha-74/